# गंगाजी नाईक अणजूरकर



यशवंत जोशी

कधी काही माणसे आपणास प्रत्यक्ष भेटतात तर कधी काही काळ सहवासात राहतात आणि निघून जातात. मात्र त्यांच्या स्मृतींचा ठसा अल्पकाळ का होईना, मनावर उमटतो व कालांतराने धूसर होत जाऊन पुसला जातो. काहींच्या सहवासाचा आपल्या जीवनावर खोल परिणाम होतो. ती माणसे हयातभर आपली सोबत करतात. काही माणसे प्रत्यक्ष भेटलेली नसतात, पण आपण त्यांच्याबद्दल ऐकतो, वाचतो आणि नकळत ती आपल्या मनात खोल घर करून बसतात. आपणाशी ती मनातल्या मनात बोलतात. त्यांच्याबद्दल आपणास आदर वाटू लागतो. प्रेम वाटते. त्यांना अधिक समजून घ्यावेसे वाटू लागते. असाच एक माणूस माझ्या मनात खोल दडून बसलेला. त्याचे नाव गंगाजी नाईक. जवळजवळ तीनशे वर्षांपूर्वी होऊन गेलेला. इतिहासाच्या पुस्तकात नामोल्लेख किंवा एकदोन वाक्यांत बोळवण करून सोडून दिलेला. ना जातीचा ना पातीचा, पण ज्या भूभागात मी जन्मलो, वाढलो आणि देहही ठेवणार आहे तो भूभाग परकीय सत्तेपासून मुक्त करण्यासाठी धडपडणारा गंगाजी इतिहासात उपेक्षितच राहिला आहे. ही खंत मनास बोचते. ते क्षात्रतेज एकदा तरी लोकांपुढे उभे करावे म्हणून हा लेखनप्रपंच.

कोण हा गंगाजी नाईक? साष्टी प्रांतात त्यावेळी पाठारे क्षत्रिय समाजाची मोठी वस्ती होती. बिंबराजाबरोबर तेराव्या शतकात मराठवाड्यातून ज्या काही क्षत्रिय जाती उत्तर कोकणात आल्या त्यापैकी ही एक जात. उत्तरेस भाईंदर, दक्षिणेस वांद्रे आणि ईशान्येस ठाणे असे चारी बाजूंनी पाण्याने वेष्ठित एक त्रिकोणी बेट होते. त्यात सहासष्ट गावे होती, म्हणून त्यास साष्टी म्हणत. इ.स.१५३४ ते १७३९ अशी सुमारे दोनशे पाच वर्षे उत्तर कोकणात पोर्तुगिजांची सत्ता होती. उत्तर फिरंगाण असेही त्यास म्हणत. पोर्तुगिजांची सत्ता असताना फार मोठ्या प्रमाणात धर्मांतर झाले. हिंदूंची एकही जात या धर्मांतरातून सुटली नाही. साष्टीतील पाठारे क्षत्रिय जातीतील खूप लोक सक्तीने बाटवले गेले. १५८० ते १५९० या काळात तर ख्रिस्ती मिशनऱ्यांनी गावेच्या गावे बाटवली. धर्मांतराच्या भीतीने जे गाव सोडून जंगलात गेले, डोंगरांत लपले व धाड ओसरताच परत घराकडे आले ते वाचले. काही पोर्तुगिजांच्या भीतीने गाव सोडून मराठी मुलखात जाऊन

राहिले. ते धर्मांतराच्या संकटांतून वाचले. त्या पाठारे क्षत्रिय जातीतला हा गंगाजी.

कोणी बाळा नाईक नावाचा पुरुष हा या गंगाजीचा पूर्वज. तो वांद्र्याचा वतनदार होता. मातीतील प्रतिष्ठित व श्रीमंत. धर्मांतराचा वरवंटा वांद्रे गावावर फिरला. एकही हिंदू बाटवायचा ठेवला नाही. १५८० ते ८६तील ही गोष्ट आहे. बरोबर नेता येईल इतके सामान बरोबर घेऊन घरातील माणसांना बरोबर घेऊन बाळा नाईक एका रात्री निसटला. रात्र अंधारी होती. बंदरावर आला. वांद्र्याच्या खाडीत बरेच मचवे नांगरून ठेवले होते. त्यातील एका मचव्यात सर्व चढले. खुंटीला बांधलेली मचव्याची दोरी तोडली व त्या काळोखात खाडीतून मचवा वल्हवित सारे जण ठाण्यास आले. ओहोटी सुरू झाली होती. मचवा तिथेच टाकून सामानासह सारी जण खाली उतरली व खाडीचे पात्र पायाने तुडवित कळवे गावात आली. पोर्तुगिजांची हद्द ठाण्यापर्यंत होती. आता नाईकमंडळी फिरंगणाबाहेर होती. धर्मासाठी बाळा नाईकाने घरादाराचाच नव्हे, तर जन्मभूमीचाही त्याग केला होता. सुरुवातीस वर्ष-दीड वर्ष बाळा नाईक कळव्यास राहिला आणि नंतर जवळच असलेल्या अणजूर गावी स्थायिक झाला. वांद्र्याचे वतनदार नाईक अणजूरकर नाईक झाले. एकट्या वांद्रे गावात त्यावेळी सहा हजार हिंदू बाटवले होते. त्यात पाठारे क्षत्रिय ज्ञातीच्या मागे पोर्तुगीज हात धुऊन लागल्याने धर्मांतरात त्यांची संख्या सर्वात जास्त होती, अशी नोंद ऐतिहासिक कागदपत्रांत सापडते.

बाळा नाईकबरोबर त्याचे दोन धाकटे भाऊ भीव नाईक आणि तान नाईक व त्यांची बायका-मुले होती. ही सर्व मंडळी अणजूरास स्थायिक झाली. या बाळा नाईकाचा मुलगा लक्ष्मण, लक्ष्मणचा मुलगा अर्जुन आणि अर्जुनचा मुलगा निंब नाईक. या नाईक घराण्यात पोर्तुगीज राजवटीविरुद्ध घृणा वंशपरंपरागत चालत आली होती आणि त्याचे कारण पोर्तुगिजांनी त्यांचे ज्ञातिबांधव बाटवण्याचा सपाटा लावला होता. इतर जातींपेक्षा या एकाच जातीच्या मागे हे लागले होते. निंब नाईकाने याविरुद्ध सर्वप्रथम आवाज उठवण्यास सुरुवात केली. मधे शंभर वर्षांचा काळ गेला. मराठ्यांना गळ घालून उत्तर फिरंगणातील पोर्तुगीज सत्ता उलथवून टाकावी हा विचार प्रथम निंब नाईकाने केला. प्रल्हाद जोशी नावाच्या एका ब्राह्मणाजवळ पत्र देऊन त्याने संभाजी महाराजांकडे पाठवले. शिवाजी महाराजांच्या मृत्यूनंतर औरंगजेब दक्षिणेत उतरला होता. संभाजी महाराजांनी नऊ वर्षे त्याच्याशी झुंज दिली होती. हे पत्र घेऊन प्रल्हाद जोशी संभाजीकडे आला, तर संभाजीस औरंगेबाने अटक केली होती. निंब नाईकाच्या खटपटीस सुरुवातीसच असा खो बसला. नंतर पंधरा-वीस वर्षे शिवशाहीच आपल्या अस्तित्वासाठी झगडत होती, तिथे फिरंग्यांवर कोण चालून येणार?

निंब नाईकास दोन बायका होत्या. थोरलीस एक मुलगा होता. त्याचे नाव शामजी. तो निराळा राहत होता आणि राजकाणात नव्हता. धाकटीस पाच मुलगे झाले. त्यांची नावे गंगाजी, बुगाजी, मुऱ्हारजी, शिवजी आणि नारायणजी. यांना एक बहीण असावी कारण तिचा ओझरता उल्लेख सापडतो. हे पाचही बंधू बापाप्रमाणे राजकारणात होते. १७१८पर्यंत निंब नाईक जिवंत होता. त्याच्या आगेमागे गंगाजी नाईकाच्या मुलीचे लग्न झालेले आहे. तिला सुतार आळीत नारायणजी सुताराकडे दिलेले होते. ही सुतार आळी म्हणजे वसईजवळील मुळगाव गावातील एक वस्ती. तिथे पाठारे क्षत्रियांची काही घरे त्यावेळी होती. वसई हे पोर्तुगिजांचे उत्तरेकडील राजधानीचे प्रमुख ठाणे. पार्तुगीज साहेबांची इथे वस्ती होती. येथील लोकांना तर त्यांनी वेठीस धरले होते. मिशनऱ्यांनी धर्मांतराचा हैदोस घातला होता. आपली मुलगी ज्या गावात दिली त्याच्या चारी बाजूस ख्रिश्चनांची वस्ती. परत हे कोठून बाहेरून आलेले नाहीत. आपलेच ज्ञातिबांधव; जुलमाला किंवा मोहाला बळी पडून परधर्मात गेलेले. त्यातील काही जुने नातेसंबंधही सांगणारे व भीतभीत का होईना जपणारे. हे सर्व पाहून गंगाजीचे मन उद्विग्न झाले. बापाने धर्म, जात, जन्मभूमीसंबंधीचा स्वभिमानाचा अंगार फुलवत ठेवला होता. अणजूरमध्ये राहून जे प्रत्यक्ष दिसले नव्हते ते प्रत्यक्ष पोटचा गोळा सुतारआळीत दैववशात पडल्याने पाहायला मिळाले. आता स्वस्थ बसून जे जे घडेल ते पाहत बसणे नाही; असा अणजुरास जाताना गंगाजीने विचार केला. घरी परतल्यावर सर्व भाऊ एकत्र बसले. एकत्र विचार केंला. हिंदू धर्म या भूमीत टिकवायचा असेल तर सर्वप्रथम पोर्तुगीज सत्ता येथून नाहीशी करायला हवी. ती आपणा पाच जणांनी किंवा सर्व ज्ञाततिबांधवांनी एकत्र येऊनही उलथवता येणार नाही. सर्वांनी खूप विचार केला, पण मार्ग सापडेना. नाईक कुटुंब मोरया गणपतीचे उपासक. तेव्हा धर्मरक्षणासाठी प्रत्यक्ष देवालाच साकडे घालायचे आणि कौल मागायचा असे ठरले.

एक जुना शेला, एक जुने धोतर, एक जुने मुंडासे, अर्धा रुपया बरोबर घेऊन गंगाजी नाईक मोरया गणपतीस निघाला. त्यावेळी दमाजी थोराताने हिंगणगावात गढी बांधून पुंडावा मांडला होता. ताराबाई व संभाजीच्या वतीने शाहूच्या मुलखात त्याने ही दांडगाई मांडली होती. त्यामुळे गावेच्या गावे ओस पडत होती, लोक भिऊन कोकणात पळत होते. याच माणसांकडून गंगाजीने घाटावरील मार्गाची चौकशी केली. मुलूख अपरिचित, संपूर्ण ओसाड. घाटावर गावे चिंचवड व पुणे. एक दिवशी जाधवाची वाडी आणि जेजुरी. बाकी गाव नाही. पायी चालत जाणे. ना वाहन ना घोडा. गणपतीचे नामस्मरण मुखाने करीत गंगाजी चालत होता. रस्त्यात थोराताचे बेरड भेटले. त्यांनी अंगावरचे कपडे व बरोबरची चीजवस्तू लुटून नेली. त्यात मार्ग चुकला. काही कळेना. पण गंगाजीने धीर सोडला नाही. मार्गात एक महार भेटला. त्यास चिंचवडची वाट विचारली. तो म्हणाला, मी मोरगावचा. मी तुम्हाला मोरगावपर्यंत नेतो. दोघे निघाले.

अंधार पडला. रात्र झाली. दोघे मोरगावजवळ आले होते.

पण अंधारात पुढे जाणे शक्य नव्हते. गंगाजी तर उपाशीतापाशी चालत होता. त्यास झोप लागली. रात्री एक स्वप्न पडले. एक ब्राह्मण स्वप्नात आला. त्याने सांगितले, तू एकवीस दिवस उपाशी आहेस. तू मोरगावास जा व पारणे कर. त्याने हातांत एक भाकरी घेतली व ती चुरून त्यात गूळ-तूप घालून तिचा चुरमा लाडू करून गंगाजीच्या हातावर ठेवला. गंगाजीने आपण ज्या कामासाठी निघालो आहोत त्याबद्दल ब्राह्मणास विचारले.'जे तू आपले मनी चिंतिले आहेस ते तुझे मनोरथ सिद्धीस पावतील, परंतु विलंब लागेल. तू आता भगवंताचे घरी पारणे करून चार दिवस राहावे.' असे सांगून तो ब्राह्मण अदृश्य झाला. गंगाजीस जाग आली. भगवंताने दृष्टांत दिला, असे पाहून गंगाजीस आनंद झाला.

पहाटे मोरगावचा भगवंत गोसावी पुजारी गंगाजीस शोधत आला. त्यासही रात्री दृष्टांत झाला होता. गंगाजीने सात दिवस घरी उपवास केला होता. मार्गात चौदा दिवस उपास घडला होता. त्याने एकवीस दिवसांच्या उपवासाचे पारणे करावे. चार दिवस विश्रांती घ्यावी. मोरगावचा भगवंत गोसावी पुजाऱ्याने त्यास सोबत देऊन चिंचवडास रवाना करावे, असा देवाचा त्याला आदेश होता. उघड्याबोडक्या गंगाजीस घेऊन पुजारी घरी आला. दोघांनी परस्परास एकाच रात्री घडलेले दृष्टांत सांगितले. चौदा दिवस चालून गंगाजीचे पायतण झिजले होते. तेही बेरडांनी पळवले. पुजाऱ्याने त्यास नवे पायतण घेऊन दिले. धोतर, मुंडासे, शेला दिला व चार दिवस पाहुणचार करून दोन गुरव बरोबर दिले.

चिंचवडास नारायण देव होते. हे मोरया गोसावीचे नातू. त्यांना देवाने आज्ञा केली, की चिंतामणी देवाकडून गंगाजीस अनुग्रह द्यावा. वस्त्रे आणि वाटखर्चास पाच रुपये व अणजूरपर्यंत सोबतीस पाच गुरव द्यावे. अनुग्रहाची साक्ष म्हणून आपल्या-जवळचा एक उजव्या सोंडेचा गणपती गंगाजीस पूजेसाठी दिला. तो कार्य सिद्धीस नेईल असा त्यास आशीर्वाद दिला. तो घेऊन गंगाजी अणजुरास आला व आता भगवंताची कृपा पाठीशी आहे या विश्वासाने कार्यास लागला. अणजुरास आजही नाईकांच्या घराण्यात देव्हाऱ्यात उजव्या सोंडेचा गणपती आहे. तो चिंतामणी देवाकडून गंगाजीस अनुग्रहात मिळालेला गणपती आहे.

गंगाजीने घरी परतल्यावर चारही भावांना विश्वासात घेऊन दृष्टांत अनुग्रहाची व कार्यसिद्धी निश्चित आहे, ही हकिगत सांगितली. त्यावर बुगाजी म्हणाला, ''प्रत्यक्ष गणपती पाठीशी असताना आपण स्वस्थ बसलो तर आपणासारखे आळशी व करंटे दुसरे कोणी नाही. ताबडतोब कामास लागायला हवे.'' म्हणून प्रथम काही जवळचे नातेवाईक विश्वासात घ्यायचे ठरले.

नामाजी देसाई मालाडकर हे मेहुणे, मायाजी राऊत कवळेकर हे मामा, नारायणजी सुतार वसईकर हे जावई, लाडकोजी हैबतराव भाईंदरकर हे व्याही, बेडजी देसाई मालाडकर हे भाचे या जवळच्या नातेवाइकांना अणजुरास बोलावून घेतले. ही मंडळी व पाच भाऊ एकत्र बसले. गंगाजीने मोरगावपर्यंतचा चौदा दिवसांचा प्रवास, बेरडाने केलेली नागवणी, अचानक रस्त्यात महार भेटणे, त्याने मोरगावपर्यंत केलेली सोबत, स्वप्नात घडलेला दृष्टांत, तसाच दृष्टांत मोरगावचा भगवंत गोसावी पुजाऱ्यास पडून तो गंगाजीस शोधत येणे, पारणे करणे, चिंचवडास पाठवणी करणे, नारायण देवांचे थोरले चिरंजीव चिंतामणी देव सहसा कुणास अनुग्रह देत नाहीत; त्यांनी तो गंगाजीस देणे, कार्यसिद्धी व्हावी म्हणून रोजच्या पूजेस उजव्या सोंडेचा गणपती देणे. सर्व वृत्तान्त तपशीलवार सांगितला. प्रश्नोत्तरे झाली. शंकासमाधान झाल्यावर सर्वांनी एकमते कार्य सिद्धीस नेण्याची शपथ वाहिली. प्रत्येकाने मदतीचा हात पुढे केला. आपापल्या गावी परतल्यावर विश्वासातील माणसे मिळवून मदतीस जोडायची अशी व्यूहरचना झाली. गंगाजी म्हणाला, ''वडील निंबाजींनी संभाजीराजांशी संधान बांधून कार्यसिद्धीचा व्यूह रचला. तो कार्यारंभीच फसला. संभाजीराजांचे पुत्र शाहूराजे साताऱ्यास आहेत. त्यांचे महाराष्ट्र राज्य या मुलखात आणायचे, फिरंगी हाकलायचा व या मुलखात महाराष्ट्र धर्म वाढवायचा.' सर्वांनी गंगाजीच्या पुढारीपणाखाली प्राणांची पर्वा न करता कार्य करायचे ठरवले.

सर्वानुमते प्रथम प्रयत्न म्हणून गंगाजी कान्होजी आंग्रेकडे गेला. फिरंगी सागरावर बलवान आहे. तसे सागरी युद्धकौशल्य फक्त कान्होजीकडे आहे. पण कान्होजीने गंगाजीची निराशा केली. त्यांनी स्पष्ट शब्दांत नकार देऊन गंगाजीस वाटेस लावले. गंगाजी कान्होजीस भेटला. तो बंड करू पाहतो ही बातमी पोर्तुगिजांना लागली. त्यांनी गंगाजीस उचलून तुरुंगात टाकले. मार्गात अडचणी येणारच म्हणून खचून जायचे नाही, हा गंगाजीचा स्वभाव होता. निर्धाराने तो त्यास सामोरे गेला. पाचशे रुपयांचा दंड भरून त्याने तुरुंगातून सुटका करून घेतली.

सारेच कामास लागले होते. बुगाजी हा गंगाजीचा धाकटा भाऊ. तो वारकरी होता. आषाढी वारीस पंढरपुरास जाण्याचा नियम होता. तुकाराम महाराजांचे तिसरे पुत्र नारायण गोसावी सत्पुरुष होते. बुगाजीने त्यांच्याकडून अनुग्रह घेतला होता. १७२० सालच्या वारीत तो देहूस नारोबा गोसावींकडे थांबला व आपल्या उपक्रमाची त्यांना माहिती देऊन आशीर्वाद मागितला. खंडेराव दाभाडे हा शाहूचा सेनापती. तोही नारोबाचा शिष्य होता. नारोबांनी त्यास बोलावून घेतले. देहूस विठोबाच्या मंदिरात दोघांची भेट घडवून आणली. बुगाजीने सर्व कामाची माहिती दिली. खंडेराव दाभाडेस प्रस्ताव आवडला. शाहूचे राज्य आपण उत्तरकोकणात आणू. फिरंगी पिटाळून लावू. तुमची गेलेली वतने तुम्हास परत देऊ. तिथला कारभार तुम्हीच चालवा. फक्त निशाण आमचे म्हणून शाहूचे राहील, अशी यशस्वी बोलणी झाली. बुगाजीने घरी परतल्यावर थोरल्या बंधूस ती सांगितली.

मालाडकर, कळवेकर, भाईंदरकर, वसईकर ही नातेवाईक मंडळी आपापल्या गावी गेल्यावर कामास लागली. जातीतील विश्वासातील माणसे गोळा करून सल्लामसलती सुरू झाल्या.

फिरंग्यांना संशय येणार नाही अशा गुप्तपणे कार्य सुरू झाले. त्यावेळी वर्णव्यवस्था चिवट होती. रोटी-बेटी व्यवहार फक्त जातीतच होई. जाती जातीत उच्चनीचता, मान-अपमान यांवरून भांडणे असत. तेव्हा सुरुवातीस काही काळ ही चळवळ पाठारे क्षत्रिय समाजापुरतीच मर्यादित राहिली. कार्यसिद्धीच्या दृष्टीने हे दृश्य नव्हते. हिंदूंच्या सर्व जातींची दु:खे सारखीच होती. फिरंगी राजा व त्याचे व बाटवाबाटवी करणारे मिशनरी हस्तक हे त्यांच्या दु:खाचे कारण होते. परंतु गंगाजी आणि मंडळींनी या चळवळीत सर्व जाती ओढल्या व त्यांना कामास लावले. छोटी छोटी लढाऊ पथके गावोगावी उभी राहू लागली.

१७२९साली मालाडचा सरदेसाई अंताजी रघुनाथ कावळे यांनी धर्मांतरास नकार देताच त्याचे वतन खालसा केले. त्याने शाहू व पेशव्यांशी पत्रव्यवहार केला. तोही येऊन गंगाजीस मिळाला. पुढील काम दोघांनी एकदिलाने व एकत्र केले.

अंताजी रघुनाथ हा शुक्लयजुर्वेदी माध्यंदिन शाखेचा ब्राह्मण होता. पौरोहित्य हा त्याचा व्यवसाय होता. संपूर्ण साष्टी तालुक्याची वृत्ती त्याच्याकडे होती. त्याने आपली माणसे वेगवेगळ्या भागांत कामासाठी नेमली होती. शिवाय सरदेसाई असल्याने हुकमतही होती. ब्राह्मण असल्याने सर्व जातींतील घरी बऱ्या-वाईट कार्यानिमित्त ब्राह्मणाचे जाणे घडे. त्या दृष्टीने पाहता समाजाचे नेतृत्व या ब्राह्मणाकडे होते. तो तापट होता असा प्रवाद आहे. परंतु या चळवळीत सर्वांना ओढण्याचे काम अंताजीने केले. फिरंग्यांविरुद्ध तीनशे वर्षांपूर्वी उत्तर कोकणात हिंदू संघटन उभे करणे व यशस्वी लढा देणे हे काम सोपे नव्हते. ते गंगाजी नाईक आणि अंताजी रघुनाथ कावळे या जोडगोळीने केले; हे नुसते महत्त्वाचे नव्हे, तर कौतुकास्पद आहे. हिंदू-संघटन ही कल्पनाच त्यावेळी अस्तित्वात नव्हती. परिस्थितीच्या रेट्यातून ती निर्माण झाली व या दोघांनी ती यशस्वीपणे राबवली. कार्यसिद्धी होताच हे संघटन जिवंत ठेवण्याच्या मागे ते लागले नाहीत यात त्यांचे काही चुकले नाही. ती तशी सामान्य माणसे होती. कालानुसार ती वागली.

अंताजी रघुनाथ गंगाजीच्या मासलीतींत सुरुवातीपासून असण्याची एक शक्यता दिसते. गंगाजीने नात्याची म्हणून जी माणसे पहिल्या बैठकीस बोलावली त्यात दोन मालाडकर आहेत. अंताजी रघुनाथ मालाडचा सरदेसाई व त्या मंडळींचा पुरोहित यामुळे मालाडकर मंडळींनी त्यास विश्वासात घेतले असावे. त्याच्या हालचाली लक्षात आल्यावर पोर्तुगिजांनी त्यावरही वरवंटा फिरवायला सुरुवात केल्यावर तो पळाला असावा.

त्याच सुमारास अणखी एक घटना घडली. बाळाजी विश्वनाथाने दिल्लीच्या मोगल बादशहाकडून चौथाई सरदेशमुखीच्या सनदा आणल्या होत्या. त्यानुसार कल्याण व भिवंडी प्रांत पुन्हा मराठ्यांकडे आला होता. तिथे रामचंद्र रघुनाथ (चासकर) जोशी यांना सुभेदार नेमले होते. हे जोशी पेशव्यांचे सावकार. त्याची बहीण काशीबाई बाजीरावास दिली होती. बाळाजी विश्वनाथ १७२७मध्ये वारला. त्यानंतर शाहूने बाजीरावास पेशवाईची वस्त्रे दिली. गंगाजीने हा विचार केला की मराठी मुलुख इतका जवळ आला असताना कल्याणच्या सुभेदारास गाठून कार्यसिद्धी का करून घेऊ नये ? पुन्हा एकत्र बसून विचार केला. निर्णय घेतला व गंगाजी कल्याणास रामचंद्र रघुनाथास भेटायला गेला.

रामचंद्र रघुनाथाने प्रस्ताव एकदम उचलून धरला. बाजीरावाची व गंगाजीची भेट घालून देण्याचे कबूल केले. तुमचा मुलुख पोर्तुगिजांकडून काढून घेऊ, महाराष्ट्र राज्य व महाराष्ट्र धर्म तिथे प्रस्थापित करू. तुमची वतने तुम्हास देऊ. दोघांची ही मुलाखत झाली तेव्हा बुगाजी गंगाजीबरोबर होता. बोलणी झाल्यावर रामचंद्र रघुनाथाने दोघांना देवघरात नेले. शाळीग्रामावरील तुळशीपत्र उचलून शपथ वाहायची या अर्थाने गंगाजीच्या हाती दिले. गंगाजीने संमतीदर्शक महादेवाच्या पिंडीवरील बिल्वपत्र उचलून रामचंद्र रघुनाथाच्या हाती दिले. आणाभाकांचा मजकूर दोघांनी कागदावर उतरवून काढला. बाजीरावाची शिक्काकटियार रामचंद्रपंताजवळ होती. ती कागदावर ठेवून ही बाजीरावाची संमतीच समजा, असे म्हणून शपथ वाहिली. दोघे भाऊ खूश झाले व अणजुरास परतले.

या भेटीत गंगाजीने पेशव्यांशी एकनिष्ठ राहावे, दुसऱ्या कुणाची मदत मागू नये असे ठरले. त्यासाठी गंगाजीने सर्व कुटुंबासह कल्याणास राहावे असे सुचविले. विचारविनिमय झाला. साष्टीतील काम चालूच राहील. साथीदार केव्हाही मदतीस धावून येतील. गंगाजीने कल्याणास राहावयास जावे. सेनापती व पेशवे दोघांशीही एकाच कामासाठी संधान बांधले, तर दोघांत दुही निर्माण होऊन कार्य फसेल; म्हणून खंडेराव दाभाडेकडील मसलत सोडून द्यावी असे ठरले. गंगाजी व पाच भावांची बायकामुले, चाकर, कुणबिणी वगैरे चाळीस माणसे तीन ताटवे भरून अणजुराहून कल्याणचे बंदरात उतरली. रामचंद्रपंताने नाईक कुटुंबाचे जंगी स्वागत केले. एक मोठे घर त्यांना दिले. उत्पन्नाची बाब म्हणून लोनाद गावची खोती दिली. नाईक लोनादचे खोत बनले.

वसई-साष्टी प्रांत घ्यायचा तर त्यासाठी खर्च येणार. गंगाजीने एक लाख रुपये द्यावेत, असे रामचंद्रपंताने सांगितले. गंगाजीस ते शक्य नव्हते. त्यांनी आपली असमर्थता व्यक्त केली. यावर गंगाजीस आपली मर्दुमकी सिद्ध करण्यासाठी रामचंद्रपंताने सांगितले. साष्टीतील मरोळची माडी मारून तेथील पाद्री पाडावा. रामचंद्रपंताची पन्नास, गंगाजीची पन्नास अशी शंभर माणसे कामगिरीवर निघाली. ही बातमी कल्याणात फुटली. यादवजी प्रभू कोल्हेरकर हा फिरंग्यांचा माणूस रामचंद्रपंताकडे नोकर होता. त्याने सविस्तर पत्र लिहून ती ठाण्यास पोर्तुगिजांना कळवली. ठाण्याहून पन्नास सोल्जर मरोळास मदतीस गेले. ठाण्याच्या खाडीत तारवांचा वेढा घालून गंगाजीस पाच दिवस साष्टीत कोंडलं. साष्टीत

मालाडकर, गोरेगावकर ही गंगाजीची माणसे होती. त्यांनी मदत केली. सहाव्या दिवशी हरजी हिंदुराव व जीवाजी भालेराव यांनी हिंमत करून रात्री दोन गलबतांतून पोर्तुगिजांचा पहारा मारून शंभर माणसे आणि लूट बंदरावर आणली. याचा राग येऊन पोर्तुगिजांनी साष्टी व अणजुरातील दोनशे माणसे धरून नेऊन तुरुंगात घातली. गंगाजीने शिपायाला लाच देऊन काही सोडवली, पण या धडपडीत रूपाजी भालेराव व त्याचे दोन भाऊ नारोजी व जानकोजी यांना पोर्तुगिजांनी पकडून गोव्यास पाठविले. तिथे इन्क्विझिशन कोर्टाने (धर्मासंबंधी निवाडा देणारे न्यायालय) मृत्युदंडाची शिक्षा दिली. या शिक्षेत त्यांच्या अंगावर तेलाने भिजलेली डगली चढविण्यात आली व त्यांना चूड लावून जिवंत जाळण्यात आले. पोर्तुगिजांच्या अमानुष क्रूर शिक्षेचा वरवंटा गंगाजीच्या माणसांवर फिरला. गंगाजीची पस्तीस माणसे फिरंग्यांनी छळ करून याच कालावधीत (फेब्रुवारी १७३२) मारली. अशा वेळी तो स्वस्थ बसणे शक्य नव्हते.

१७२२च्या पावासाळ्यात बाजीराव साताऱ्यास छत्रपतींच्या जवळ आहे असे कळताच गंगाजी आपल्या चार भावांना बरोबर घेऊन साताऱ्यास गेला. उत्तरकोकणातील फिरंग्यांच्या छळाचा सर्व वृत्तान्त कथन केला. लवकर कारवाई करावी हा आग्रह सर्व बंधूंनी धरला. गंगाजीची छत्रपतींशी व बाजीरावाशी ही पहिलीच भेट होती. दोघांनीही नाईक बंधूंचे म्हणणे शांतपणे ऐकून घेतले. बाजीरावाने कारवाई करण्याचे आश्वासनही दिले.परंतु उत्तरेत बंडाळी उद्भवल्यामुळे तो तिथे निघून गेला. १७२४च्या अखेरपर्यंत वसईचे काम रखडले. तोपर्यंत बाजीराव उत्तरेतच अडकून होता. त्यानंतर फौजेव्यतिरिक्त मोहीमेस जो खर्च येईल तो आपला आपण करावा व फौजेचा सर्व खर्च रामचंद्रपंतांनी करावा हा प्रस्ताव नाईकबंधूंनी ठेवला. तो रामचंद्रपंतांनी स्वीकारला. १७२५ मध्ये बाजीराव जुन्नरास होता. गंगाजी त्यास भेटला. मोहीम हाती घ्यायचे ठरले. तयारीही झाली. इतक्यात श्रीरंगपट्टणचे तातडीचे काम निघाले. बाजीराव तिथे निघून गेला. वसईची मोहीम मागे पडली. असे सारखे घडत होते. बाजीरावास वसईवर स्वारी करायला वेळच मिळत नव्हता.

१७२८मध्ये रामचंद्रपंत मरण पावला. फिरग्यांनी नंतर कल्याण मारले. रामचंद्रपंतांच्या भावास कृष्णरावास कल्याणचा सुभेदार नेमले होते. तो घाटावर राहूनच कारभार हाकलत होता. गंगाजीच्या मनसुब्यास दहा वर्षं झाली तरी सुरुवात होत नव्हती. दरम्यान १७२९मध्ये अंताजी रघुनाथ कावळे याचे मालाडचे वतन फिरंग्यांनी जप्त केले. तेव्हा तो कल्याणास येऊन गंगाजीस मिळाला. गंगाजीस एक समर्थ मदतनीस मिळाला.

पिलाजी जाधव कोकणात उतरतो, तेव्हा गंगाजी त्यास मदत करतो. पिलाजी हा पेशव्यांचा विश्वासू सरदार. साष्टीतील फिरंग्यांची ठाणी तो मारत जातो. तेव्हा गंगाजी व त्याचे बंधू निशाण घेऊन आघाडीवर आहेत. कृष्णरावास हे सहन होत नाही. तो ते निशाण गंगाजीच्या हातून हिसकावून घेऊन मागे हत्तीवर देतो. त्याचे हे वर्तन शंकराजी सरदारासही आवडत नाही. कृष्णरावाचे धोरण फिरंग्यांशी मैत्रीचे होते. या मोहिमेत कळवे ते कामणदुर्ग, राजावळी, जीवदान गड, तांदूळवाडी, मनोरपर्यंत पिलाजी मुलुख मारीत जातो. गंगाजीची फौज त्याच्याबरोबर आहे. त्यात गंगाजीस कर्ज होते. घरातील बायकांच्या अंगावरील दागिने विकूनही ते फिटण्यासारखे नसते, म्हणून गुजरातेत काही परिचित जातभाईंकडे पैसे आणण्यासाठी तो जातो.

वसईची मसलत अद्याप जमत नाही म्हणून सर्व खट्टू होतात. कर्जाचा डोंगर डोक्यावर वाढत असतो. पुन्हा बैठक बसते. त्यात शिवजी व बुगाजी नाईक यांनी अंताजी रघुनाथबरोबर पुण्यास जाऊन बाजीरावास भेटावे आणि गंगाजीने पैशासाठी गुजरातेत जावे असे ठरते. साडेतीन-चार वर्षे अशीच निघून गेलेली आहेत. काम काही होत नाही.

अंताजी व मंडळींचे म्हणणे बाजीराव ऐकून घेतो. कल्याणची सुभेदारी कृष्णरावाकडून काढून घेतो व वासुदेव जोशीस तिथे नेमतो. भिकाजी हरिभक्त या विश्वासू माणसास मोहिमेपूर्वीच पाहणी करण्यास त्यांच्याबरोबर पाठवितो. तो कल्याणास येतो. गंगाजीने फिरंग्यांच्या मुलखातही अगदी वसईच्या किल्ल्यातदेखील आपले हेर पेरलेले होते. कळव्यास ठाण्याच्या खाडीत मचव्यात बसून मरोळ, वांद्रे, वेसावे, बोरिवली अशी धारावीपर्यंतच्या मुलखाची पाहणी तो करतो. नंतर पुढे कोण बंदरात उतरून राजावळी, उमेळे, पापडी, सुतार आळी ते अगदी कल्याणपर्यंत तो शत्रूच्या मुलखात घुसून पाहणी करतो. वेसावे उमळे, सुतार आळी येथे कुण्या चौधरी, गुजाबाई सुतारीण यांच्याकडे त्याची जेवण्याचीही सोय करतो. त्यानंतर पुण्याहून अशी पाहणी करण्यासाठी माणसे येऊ लागली. तेव्हा साहाय्य करणाऱ्या स्थानिक मंडळींना भीती वाटू लागली की, आपण पकडले गेलो तर घरादारास मुकून फिरंग्यांची कैद भोगावी लागेल. त्यांची भीतीही चार धीराचे परमेश्वरी आश्वासनाचे शब्द सांगून गंगाजी दूर करी.

१७३३च्या मे किंवा जूनमध्ये बाजीराव अलिबागेस कुलाब्यास होता. तेव्हा गंगाजी व अंताजी रघुनाथ त्यास जाऊन भेटले व वसईची मोहीम आता तरी हाती घ्या, असा आग्रह धरला. बाजीराव नाही म्हणत नव्हता, पण काम करीत नव्हता. पुण्यास गेल्यावर बाजीराव माळव्यात निघून गेला आणि पुन्हा वसईची मुलुखगिरी रखडली. पेशवे येत नाहीत म्हणून गंगाजी-अंताजी नाराज असले तरी स्वस्थ बसलेले नव्हते. आपापल्या परीने फिरंग्यांच्या चौक्या, माड्यांवर छापे घालून दहशत वाढवत होते. याच कालावधीत पोर्तुगिजांनी १७३२मध्ये गोव्यात पिंट्रो मास्कारिनाची गव्हर्नर म्हणून नेमणूक केली. व वसईला लालुद बोर्तेला कॅप्टन नेमले. दोघांनाही मिशनऱ्याकडून सर्व उत्तर कोकण बाटवून काढा, अशी सक्त ताकीद होती. त्यांनी धर्मांतराचा सपाटा लावला. साष्टीची सरहद्द मजबूत करण्यासाठी ठाण्यास

१७३४मध्ये पाच बुरुजांचा एक मजबूत किल्लाही बांधला. फिरंग्यांच्या आक्रमक व धर्मांध पवित्र्याने गंगाजी-अंताजी कमालीचे हैराण झाले. पेशवे येत नाहीत म्हणून त्यांचा रागही येत होता. परंतु दुसरा पर्यायही त्यांच्यापुढे नव्हता. दरम्यान शाहूने चिमाजी आप्पास १७३६ साली सिद्दीसोबत पत्र पाठवले. त्याने रेवस कापून काढले. माळव्यात मुलुखगिरी करायला, सिद्दीस कोकणात उतरून मारायला पेशव्यांना वेळ आहे. पण हिंदू धर्म बुडवणाऱ्या फिरंग्यांना बुडवायला वेळ नाही. याचा संताप येऊन गंगाजी-अंताजी पेशव्यांना जाब विचारायला पुण्यास आले.

अनेकांच्या गाठीभेटी घेतल्या. पेशव्यांपर्यंत पोहोचण्याचे चिन्ह दिसेना. त्या काळीही खालच्या सरदार-दरकदारांना सलाम करून मर्जीत आणि मसलतीत ओढल्यावाचून वरिष्ठांपर्यंत मुलाखत मिळू शकत नव्हती. बऱ्याचदा बाजीराव पुण्यास नसे. कुठेतरी मोहिमेवर गेलेला असे. सोक्षमोक्ष लावायच्या इराद्याने आलेल्या गंगाजी-अंताजी दुकलीस पेशवेच भेटेनात. मग त्यांनी निर्धार केला. पेशवे भेटल्याशिवाय डुईवरील केसच काढायचे नाहीत. तीन महिने दोघे हजामत न करता पुण्यात फिरत होते. पुण्यात तो चर्चेचा विषय झाला होता. आता यांचा अधिक अंत पाहू नये असा विचार करून बापुजी श्रीमंत, वासुदेव जोशी, मारसेठ शंकराजीपंत आदी मंडळींनी या दोघांची चिमाजी आप्पाशी भेट घडवून आणली. बाजीराव दिल्लीकडे गेला होता. चिमाजीशी दोन-तीन दीर्घ बैठका झाल्या. फिरंगाणावरच्या मोहिमेचा तपशील निश्चित झाला. स्वत: आप्पासाहेब मोहिमेवर येण्याचे ठरले. चैत्र शुद्ध सप्तमी १७३७ साली दोन बाजूंनी फौजा कोकणात उतरणार होत्या. एक राजमाचीहून व दुसरी माहुलीहून. सर्व बेत निश्चित ठरवून साष्टी-वसई फौजेची आखणी करण्यासाठी गंगाजी कल्याणला आला.

साष्टी-वसईतील आपल्या सर्व मंडळींना एकत्र आणण्यासाठी त्याने कल्याणला भवानीचा गोंधळ घातला. त्यास झाडून सर्व कामाची महत्त्वाची माणसे हजर होती. पुण्यात ठरलेल्या गोष्टी, येथे आपण करावयाची कामे याची साद्यंत माहिती दिली. कामाची वाटणी केली. सर्व कामे वाटल्यावर गोंधळ संपून जो तो आपल्या कामाच्या ठिकाणी निघून गेला.

राजमाचीकडून येणाऱ्या तुकडीचे स्वागत बुगाजी नाईक व बंधू अंताजी करणार होते. त्यांना ठाणे व साष्टी हा मुलुख कामगिरीसाठी दिला होता. माहुलीकडून येणाऱ्या तुकडीचे स्वागत स्वत: गंगाजी व त्याचे वसईकर साथी करणार होते. ठाण्याचा किल्ला पहिला हस्तगत करायचा असा गंगाजीचा डाव होता. तिथे फिरग्यांचा बंदोबस्त वसईइतका मजबूत नव्हता. शिवाय गंगाजीने आपले हेर फिरंग्यांत पेरून ठेवले होते. 'खारिचे बुरूजकऱ्यास गंगाजी नाईकाने जाब देनू जादा हाती पाच रुपयाचे कैफसरा खावविला होता.' गंगाजीची ही युक्ती बुगाजी व मोऱ्हारजी या भावांना ठाऊक होती. त्यामुळे खाऱ्या बुरुजाच्या बाजूने त्यांनी रात्रीच्या वेळी हल्ला करून मराठे किल्ल्यात घुसले. गाफिल फिरंगी त्यांनी कापून काढला. किल्ला व ठाणेदारही हस्तगत झाला. ठाण्यातील पोर्तुगीज उरणला पळून गेला. खारी बुरुजाचे नाव चिमाजी आप्पाने 'फत्ते बुरूज' ठेवले. ठाणे ताब्यात आल्याचे चिमाजी आप्पास तो बदलापूरजवळ आला असताना समजले.

माहुलीहून आलेल्या तुकडीचे स्वागत खुद्द गंगाजीने केले. शंकराजीपंत, मोरोजी शिंदे आदी सरदार त्यात होते. तुंगार डोंगरावर वाघटाक्यावर बसून पुढे कूच कसे करायचे याची आखणी गंगाजीने केली. राजावळी चौकीवर फिरंग्यांनी पहारा मजबूत केला होता. त्यांना हल्ला होणार याची बातमी कळली होती. तसेच गडखिंवऱ्याचा दादरा (पूल) पहारा वाढवला होता. गंगाजीस खडान् खडा माहिती मिळाली होती. या दोन्ही ठिकाणचे चौकी पहारे कापून काढून गंगाजी राजावळी-उमेळादरम्यानची खाडी तराफे व होड्या करून पार करतो. माणिकपुरात सैन्याचा तळ पडतो. वसईचा कप्तान घोड्यावरून पापडीस येतो. शत्रूसैन्यास उघड्या मैदानास तोंड देण्याचा विचार बदलून तो परत किल्ल्यात जातो. शंकराजीपंत व गंगाजीपंत एकत्र बसून विचार करतात व सरळ बहाद्दरपुऱ्यावर चालून जातात. बहाद्दरपुरा म्हणजे आजची वसई. पोर्तुगीज नागरिक किल्ल्यात आश्रयास धावतात. बाकीच्या रयतेस गंगाजी अभय देतो. वसईच्या किल्ल्यावर मोर्चे लावले जातात. गंगाजीच्या या तुकडीत त्याचा एक भाऊ शिवजी नाईकही आहे. वसईच्या पहिल्या १७३९च्या स्वारीत गंगाजी सक्रिय आहे. वसई किल्ल्यावर मोर्चे लावण्यात तो आघाडीवर आहे. पुरेसे सैन्यबल व साधनसामग्री या तुकडीजवळ नसावी. तसे शंकराजीपंतांचे चिमाजीस लिहिलेले पत्र उपलब्ध आहे.

१७३७च्या पहिल्या मोहिमेचे नेतृत्व चिमाजीने केले आहे. वांद्रा, वरसोवा आणि वसई हे तीन किल्ले पोर्तुगिजांनी लढून आपल्या ताब्यात ठेवले आहेत. त्यांची मनोर अशीरगडपर्यंतची पूर्वेकडची व साष्टी, वसई पट्ट्यातील माहीम, शिरगाव तारापूरपर्यंतची सर्व ठाणी दोन महिन्यात मराठ्यांनी जिंकली. त्यांची तात्पुरती व्यवस्था लावून पावसाळा सुरू होण्यापूर्वी चिमाजी पुण्यास निघून गेला. तिथे दुसरी कामगिरी अंगावर पडल्याने त्याचे दीड वर्ष वसईकडे दुर्लक्ष झाले. त्याचा फायदा पोर्तुगिजांनी घेतला. त्याने गोव्याहून मदत मागविली. जंजिऱ्याचा सिद्दी व मुंबईच्या इंग्रजांनीही त्यांना मदत केली. मराठ्यांनी जिंकलेली उत्तर फिरंगाणातील त्यांची सर्व ठाणी त्यांनी परत जिंकली. गंगाजी मात्र वसई किल्ल्याबाहेर ठिय्या देऊन होता. पोर्तुगिजांनी जिंकलेल्या ठाण्यावरील मराठ्यांची पराभूत माणसे गंगाजीकडे वसईस येत होती. त्यांना तो सांभाळून धरत होता. हे काम सोपे नव्हते. झटापटी अधूनमधून होत होत्या. पण किल्ल्यावर चढाई करण्याइतकी साधनसामग्री व सैन्यबळ त्याच्यापाशी नव्हते.

त्यानंतर वासुदेव जोशी व रघुनाथ हरि यांनी एक लांबलचक

पत्र चिमाजीस लिहून पोर्तुगिजांनी मुलुख परत काबीज केला आहे. आपले सैनिक सोडून पळून जात आहेत इत्यादी गोष्टी कळवल्या. हे दीड वर्ष गंगाजीने मोठ्या धैर्याने हाताळले आहे. १७३८च्या डिसेंबरात चिमाजी पुन्हा उत्तर कोकणात उतरतो. तत्पूर्वी गोवा व मुंबईहून वसईच्या पोर्तुगिजांना मदत मिळणार नाही याचा बंदोबस्त करतो. डिसेंबर ते मार्चपर्यंत पोर्तुगिजांनी जिंकलेली सर्व ठाणी परत मिळवतो. वांद्रा, वरसोवा आणि धारावी येथूनही फिरंगी पिटाळून लावतो. अवघा फिरंगी वसईच्या किल्ल्यात चेपतो. माघ पौर्णिमेपासून वैशाख पौर्णिमेपर्यंत चिमाजीच्या नेतृत्वाखाली वसईचा रणसंग्राम झडतो. पाचही नाईकबंधू व अंताजी रघुनाथ या संग्रामात शस्त्रे घेऊन चिमाजीबरोबर आहेत. ५ मे १७३९ला किल्ल्याचा सेंट सेबॅशियस बुरुज मराठे फोडून आत घुसतात. या घनघोर लढाईत गंगाजीचा भाऊ मुऱ्हारजी नाईक धारातीर्थी पडतो. त्याची बायको सती जाते. वसईचा किल्ला १३ मे १७३९ रोजी मराठ्यांच्या ताब्यात येतो. पोर्तुगीज उत्तर फिरंगणातून उन्मळून पिटाळला जातो.

गंगाजीची अठरा-एकोणीस वर्षांची मेहनत सफल होते. त्यास किती आनंद झाला असेल याची सहज कल्पना करा. आपला सख्खा भाऊही त्याने या संग्रामात गमावला आहे. त्यानंतर संपूर्ण पावसाळा तो जिंकलेल्या मुलखाची व्यवस्था लावण्यात चिमाजीबरोबर आहे. जाताना चिमाजी त्यास पुण्याला बरोबर नेतो. बाजीरावाची व त्याची भेट घालून देतो. कबूल केलेल्या वतनाची कागदपत्रे द्यायला सांगून बाजीराव परत उत्तरेकडे निघून जातो. चिमाजी शाहूस भेटण्यास साताऱ्यास निघून जातो. गंगाजी व अंताजी तीन महिने पुण्यात वतनपत्रे मिळवण्यासाठी थांबतात. कोणीही त्यांची दाद घेत नाही. शेवटी कंटाळून घरी परतात.

दरम्यान, एप्रिल १७४०मध्ये बाजीराव नर्मदातीरी रावेर येथे मरण पावतो. चिमाजीआप्पा डिसेंबर १७४०मध्ये मरण पावतो. नानासाहेब त्यानंतर पेशवा होतो. गंगाजी व अंताजी त्याच्याकडे वतनाची कागदपत्रे व सनदा मागण्यास जातात. नानासाहेब त्यांस सांगतो, 'वसईच्या मोहिमेवर एक कोटी रुपये खर्च झाला आहे. वतने आणि वृत्तीची पत्रे कसली मागता?' व साफ नकार देतो. अंताजी ब्राह्मण शीघ्रकोपी होता. त्याने नानासाहेबास पुत्रशोकाचा शाप दिला. पण गंगाजी बिचारा पडला शिपाईगडी. तो हिरमुसला होऊन घरी परतला. 'हेच फळ काय मम तपाला!' असे त्यास निश्चित वाटले असणार. तो कल्याणास परतला. घर व जमीनजुमल्याची व्यवस्था बुगाजीस सांभाळायला सांगून आपल्या विधवा बहिणीला बरोबर घेऊन काशीयात्रेस निघून गेला.

असा हा गंगाजी इतिहासाची जुनी पाने चाळताना मला प्रथम भेटला. त्याने माझे मन वेधून घेतले. बखरीतून तो माझ्याशी बोलला. एकदा स्वप्नातही आला आणि मग मनाशी ठरवले, गंगाजीस परत जिवंत करून शब्दांतून साकार करावे.

गंगाजीचा देवावर विश्वास आहे. तो विश्वासच त्यास धर्मरक्षणात यश मिळवून देतो. क्षात्रतेज त्याच्या अंगात मुसमुसत असले तरी तो साधा शिपाईगडी नाही. ध्येयवादी आहे. बापाने सुरू केलेले कार्य पूर्ण करण्याची जिद्द त्याच्यात आहे. धाडसी आहे. अडचणींना न डगमगता तो त्यांना सामोरा जातो व त्यातून मार्ग काढतो. तो स्वभावाने शांत आहे. त्याच्या अंगी कमालीची चिकाटी आहे. कुटुंबवत्सल गंगाजीचे संघटनकौशल्य वाखाणण्यासारखे आहे. तो शब्दाचा पक्का आहे. पेशव्यांशी निष्ठा एकदा मान्य केल्यानंतर तो खंडेराव दाभाडेंकडे जात नाही. मुत्सद्दी, धोरणी व राजकारणीपणातही तो मागे नाही. शत्रूच्या गोटात हेर पेरून बरोबर गुप्त बातम्या तो काढतो. बुरुजावरील पहारेकऱ्यांना अफूसारखे मादक द्रव्य चारून बुरुजावर हल्ला करण्याची त्याची क्लृप्ती अपूर्व आहे. अंताजी रघुनाथासारख्या तापट माणसाशी संघर्ष किंवा स्पर्धा तो करीत नाही; तर त्याचे सहकार्य मिळवून कार्यसिद्धीसाठी वाटचाल करतो. वतनाची इच्छा त्यास नव्हती असे नाही. परंतु तेवढेच उद्दिष्ट नसल्यामुळे ते मिळत नाही म्हणून तो आदळआपट करीत नाही, तर घराची व सर्व व्यवस्था लावून काशीयात्रेस निघून जातो. अवघे वीस-बावीस वर्षांचे त्याचे आयुष्य आपल्यासमोर आहे. त्यावरून त्याच्या कार्यकर्तृत्वाचे जे दर्शन घडते ते थक्क करणारे आहे. आणि मनात एक विचार तरळून जातो. गंगाजी नाईक नसता तर कुणी सांगावे गोव्याप्रमाणे वसई प्रांतावरही पोर्तुगिजांची सत्ता हिंदुस्थान स्वतंत्र झाल्यावरही राहिली असती!

असा हा स्वातंत्र्यसेनानी गंगाजी नाईक इतिहासात उपेक्षितच राहिला.

त्याच्या पवित्र स्मृतीस त्रिवार वंदन. ❀❀

**यशवंत जोशी**

बी-६, चर्चव्ह्यू, सातमादेवी, मुळगाव वसई- ४०१२०१

दूरध्वनी : ९५२५०-२३२४३२८

हार्दिक शुभेच्छा! मो.: ९८९०८७९७८६

सुदेश प्रभाकर चौधरी

नगरसेवक - विरार नगरपरिषद

सदस्य : बांधकाम समिती, पाणीपुरवठा समिती

कार्यालय : काळा हनुमान रोड, विरार (पूर्व), फोन : ९५२५० - २५००९२१

निवास : कल्प-प्रभा, वर्तक नगर, विरार (प.), फोन : ९५२५० - २५०४१४३